# प्रेसनोट

आदेश.क्र.पोउआ/वाहतुक/११३०९/२०१७ पुणे शहर दिनांक २३ /१२/२०१७

पुणे शहरात पर्वती जलकेंद्र ते लष्कर जलकेंद्र पर्यत भुमिगत २२०० मीमी व्यासाची जलवाहिनी टाकण्याचे काम कोया ॲण्ड कंपनी कन्स्ट्रक्शन लिमिटेड यांचे वतीने दिनांक २४/१२/२०१७ रोजीपुासन मम्मादेवी चौक ते सोलापुर बाजार चौकातुन गोळीबार मैदान असे काम चालु करण्यात येणार आहे. त्याचा वाहतुकीवर त्याचा परिणाम होत आहे व वाहतुक कोंडी होत आहे. महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मी अशोक मोराळे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक पुणे शहर मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन पुढीलप्रमाणे सदर भागात वाहतुक कोंडी होवु नये म्हणुन वाहतुक सुरळित चालण्यासाठी खालील मार्गाने डायव्हर्शन केल्यास वाहतुकीची कोंडी न होता वाहतुक सुरळित व सुरक्षित चालू राहिल.

१. सोलापुर रोडने स्वारगेट कडे जाणा-या सर्व वाहनांनी एस.एम.जोशी लेनने पुढे खटाव बंगला चौक-सीडीओ चौक-गोळीबार चौक या मार्गाचा वापर करावा.
२. एस.एम.जोशी शाळेकडुन स्वारगेटकडे जाण्यास प्रवेश बंद करण्यात येत आहे.
३. नेपीअर रोडने एस.एम.जोशी विदयालयाकडुन खटाव बंगला चौकापर्यत सोलापुर रोडने येणा-या वाहनांसाठी एकेरी वाहतुक करण्यात येत आहे.
४. लुल्लानगरकडुन येणा-या वाहनांस खटाव बंगला चौकातुन उजवीकडे वळण्यास प्रवेश बंद करण्यात येत आहे. सदर रोडने येणारी सर्व वाहनांनी गोळीबार चौकातुन खाण्यामारुती चौकातुन पुढे सोलापुर रोड या मार्गाचा वापर करावा.
५. सॅलेस्बरी पार्ककडुन येणा-या सर्व वाहनांना उजवीकडे वळण्यास बंदी करण्यात येत असुन सदर वाहनांनी गोळीबार चौक ते खाण्यामारुती चौक ते सोलापुर बाजार चौक पुढे नेपीअर रोडने खटाव बंगला चौकातुन डावीकडे वळुन कोंढवा या मार्गाचा वापर करावा.
६. गोळीबार मैदान चौकातुन स्वारगेटकडे जाणारा मार्ग हा टप्पा टप्याने बंद करुन वाहतुक वळविण्यात येणार आहे.
७. लुल्लानगर चौकाकडुन येणा-या वाहनांनी सीडीओ चौकातुन डावीकडे वळुन गिरीधर भवन मार्गे स्वारगेटला जाण्यासाठी प्रवेश देण्यात येत आहे.

तरी सर्व नागरिकांनी वाहतुक ड्रायव्हर्शन नुसार मार्गाचा वापर करुन वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे असे आवाहन पुणे शहर वाहतुक शाखा यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.